नियमित फौजदारी खटला नं.१४३६/२०२१
निशाणी- २२

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा जबाब.</u>

मी शपथेवर कथन करते की,
माझे नांवः- नाजिया अमिन शेख
वयः- ४० वर्षे, धंदाः- गृहिणी
राहणार- विमाननगर, पुणे.

<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्री. डी. एल. वाडेकर यांचेकडूनः-</u>

१. फिरोजा ही माझी आई आहे. आसिफ मामा आहे. इशरत नब्बु खान यांना मी ओळखते, त्याचे वडिल आमचे आईचे भाडेकरी आहे. साबिर खान आणि जाकीर खान यांना मी ओळखते ते आमचे शेजारी आहेत. सन २०२१ मध्ये मी पुण्याला राहत होते. दि. १०/१०/२०२१ रोजी मी आईकडे आले होते.

२. दि. १०/१०/२०२१ रोजी दुपारी ३.१५ वा. आईच्या घरी मी, आई आणि मामा गप्पा मारत बसलो होतो. त्यावेळेस इशरत नबु खान यांचा माझ्या आईला फोन आला. तिने माझ्या आईला फोनवरुन सांगितले की, घराचा रस्ता जाळी आणि बांबु लावुन साबिर खान आणि जाकीर खान यांनी बंद केलेला आहे, त्याचे कारण विचारले असता त्यांचेमध्ये वाद झाले, त्यांनी तिला मारहाण केली, तिचा बुरखा फाडला, चैन तुटली आणि जिवे मारण्याची धमकी दिली, आम्ही तुला येथे राहु देणार नाही असे सांगितले. त्यानंतर आम्ही त्याठिकाणी गेलो. त्यानंतर पोलिसांनी माझा जबाब घेतला. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

<u>उलट तपास आरोपी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एम.गवळी यांचेकडूनः-</u>

२. मी दि. १०/१०/२०२१ पूर्वी दोन दिवस आईकडे आले होते, दि. १०/१०/२०२१ रोजी आले होते हे बरोबर नाही. माझ्या आईचा फोन क्र. ९८२२३३६०२८ आहे. या नंबरवर कोणत्या नंबरवरुन फोन आला होता ते सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, तपासा दरम्यान सदर फोनचे रेकॉर्ड आम्ही दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दि. १०/१०/२०२१ रोजी माझ्या

आईला फोन आला नव्हता, मी त्या ठिकाणी गेले नव्हते आणि म्हणुन माझ्याकडे ते रेकॉर्ड नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांना जाकिर इस्माईल खान याचे नाव सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, जाकिरने तिला मारहाण केली, तिचा बुरखा फाडला, चैन तुटली असे सांगितले नव्हते. साक्षीदार सांगते की, जाकिरचे नाव नाही घेतले परंतु साबिरचा भाऊ असे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आईच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास आरोपी क्र.२ तर्फे विधीज्ञ श्री.समीर शेख यांचेकडूनः-

(आरोपी क्र.१ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास आरोपी क्र.२ यांनी स्वीकारला.)

उलट तपास पुर्ण.
फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

CHARATE HAMPE MANISHA

Digitally signed by CHARATE HAMPE MANISHA
DN: cn=CHARATE HAMPE MANISHA, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6950843, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.07.21 16:03:40 +0530

(श्रीमती मनिषा द. चराटे-हंपे)
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दि.२१/०७/२०२५
अहमदनगर